# नाशिक शहराचा दर शनिवारी पाणी पुरवठा बंद असल्याबाबतचे जाहीर निवेदन

## तरी नागरीकांनी नाशिक महानगरपालिकेस सहकार्य करावे. ही नम्र विनंती

विषय :- अल- निनो परीस्थितीच्या पार्श्वभुमीवर संभाव्य पाणी टंचाई निवारणाकरीता विशेष कृती आराखडा तयार करणेबाबत.

संदर्भ :- १) मा.प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.५०/२६/सिंव्य(धोरण) दि. १३/०६/२०२६

२) मा. जिल्हाधिकारी कार्यालय यांचे पत्र जा.क्र. कक्ष.-२/नपा-४/१/COLNSK-५९/८८३-२/२०२६ NAGARPALIKA दि.१५/०६/२०२६

उपरोक्त विषयांकीत व संदर्भिय पत्रान्वये भारतीय हवामान विभागाने व्यकत् केलेल्या अंदाजानुसार या वर्षी अल-निनो परीस्थितीचा प्रभाव रहाण्याची शक्यता असुन त्यामुळे पर्जन्यमानात घट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. राज्यातील विविध धरणे जलाशय व इतर जलस्त्रोतांमधील उपलब्ध पाणी साठयाचा विचार करता पिण्याच्या पाण्याचा गरजांना सर्वोच्या प्राधान्य देणे आवश्यक असल्याबाबतच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. भविष्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्मान होऊ नये यासाठी तातडीने प्रतिबंधात्मक उपाय योजना करणे आवश्यक असल्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहे.

१. नाशिक शहराला पाणी पुरवठा करणेसाठी सर्वसाधारणपणे सरासरी दररोज ६०० द.ल.लि. प्रतिदिन इतके कच्चे पाणी (Raw Water) गंगापुर धरण समुह व मुकणे धरण येथुन उचलण्यात येते. त्यावर शहरातील सात ठिकाणी असलेल्या जलशुध्दीकरण केंद्रात शुध्दीकरण करुन १३४ जलकुंभादवारे व सुमारे २५०२ कि.मी. लांबीच्या जलवाहीन्या मधुन शहरात पाणी वितरीत करण्यात येते.

२. दिनांक १५ आक्टोबर २०२५ ते ३१ जुलै २०२६ (२९० दिवस) या कालावधीकरीता गंगापुर धरण समुह व दारणा धरण समुहामधील नाशिक महानगरपालिकेकरीता उपलब्ध असलेल्या पाण्यानुसार पाणी आरक्षण व वापर तक्ता (दि. १४ जुन, २०२६ )

(दि. १५ जुन २०२६ रोजीची स्थिती)

| अ.क्र | स्त्रोत | पाणी आरक्षण दि. १५/१०/२०२५ ते दि. ३१/०७/२०२६ (दशलक्ष घनफुट) | प्रत्यक्ष पाणी वापर दि. १५/१०/२०२५ ते दि. १४/०६/२०२६ (दशलक्ष घनफुट) | सरासरी प्रतिदिन वापर (दशलक्ष घनफुट) | आरक्षणापैकी शिल्लक पाणी साठा (दशलक्ष घनफुट) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | (३-४) ६ |
| १ | गंगापुर | ४६०० | ३६६०.९० | १५.०६ | ९३९.८१ |
| २ | दारणा | २०० | २१७.८२ | ०.९० | -१७.८२ |
| ३ | मुकणे | १६०० | १२५५.९८ | ५.१७ | ३४४.०२ |
| एकुण पाणी साठा | | ६४०० | ५१३३.९९ | २१.१३ | १२६६.०१ |

| महीना | एकुण पाणी पुरवठयाचे दिवस | पाणी कपातीचे दिवस | पाणी पुरवठयाचे दिवस | पाणी आरक्षण | प्रत्यक्ष वापर | शिल्लक पाणी साठा | दैनंदिन सरासरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जुन २०२६ | १६ | २ | १४ | | | | |
| जुलै २०२६ | ३१ | ०४ | २७ | | | | |
| ऑगस्ट २०२६ | ३१ | १२ | १९ | | | | |
| | ७८ | १८ | ६० | ६४०० | ५१३३.९९ | १२६६.०१ | २१.१३ |

एकुण आरक्षण ६४०० - प्रत्यक्ष वापर ५१३३.९९ = शिल्लक पाणी साठा १२६६.०१ दैनंदिन सरासरी २१.१३ सदर नुसार शिल्लक पाणी साठा हा ६० दिवस पुरेल इतका शिल्लक असुन ऑगस्ट अखेर पर्यंत एकुण ७८ दिवस असल्याने उपरोक्त प्रमाणे १८ दिवसांची तुट येत आहे. त्यानुसार जुन महीन्यातील दोन शनिवार जुलै महीन्यात ०४ शनिवार व ऑगस्ट महीन्यात दोन दिवसाआड पाणी कपात करणे अनिवार्य असल्याने त्याचे नियोजन वरील तक्त्याप्रमाणे करण्यात आलेले आहे. त्यानुसार नाशिक शहराचा यापुढील जुन व जुलै महीन्यातील प्रत्येक शनिवार पाणी पुरवठा होणार नाही व ऑगस्ट महीन्यात दोन दिवसाआड म्हणजेच १, ४, ७, १०, १३, १६, १९, २२, २५, २८ व ३१ ऑगस्ट २०२६ रोजी पाणी पुरवठा होणार नाही, यांची नागरीकांनी नोंद घ्यावी व नाशिक महानगरपालिकेस सहकार्य करावे ही नम्र विनंती.

स्वाक्षरीत/-
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग (पापु)
नाशिक महानगरपालिका, नाशिक